महानगरपालिका रिक्त पदांची पोटनिवडणूक -
मतदार यादी तयार करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्र.रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.१८/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
आयुक्त,
धुळे, अहमदनगर, नांदेड-वाघाळा, मिरा-भाईंदर,
सांगली-मिरज-कुपवाड व पनवेल महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिका रिक्त पदांची पोटनिवडणूक -
मतदार यादी तयार करण्याबाबत...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ०९/११/२०२१ रोजीचे आदेश

महोदय,

खालील धुळे,अहमदनगर, नांदेड-वाघाळा, मिरा-भाईंदर,सांगली-मिरज-कुपवाड, पनवेल या महानगरपालिकेतील सदस्यांची पदे रिक्त झाल्याच्या सूचना संबंधित महानगरपालिकांकडून राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | प्रभाग / जागा क्र. | पद रिक्त होण्याचे कारण | पद रिक्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ५ ब | राजीनामा | १४/०१/२०२० |
| २ | अहमदनगर | ९-क | अनर्ह | २७/०२/२०२० |
| ३ | नांदेड-वाघाळा | १३-अ | निधन | २६/०१/२०२० |
| ४ | मिरा भाईंदर | १०-ड | निधन | ०९/०६/२०२० |
| ५ | मिरा भाईंदर | २२-अ | निधन | २६/०६/२०२१ |
| ६ | सांगली मिरज कुपवाड | १६-अ | निधन | २९/०७/२०२० |
| ७ | पनवेल | १५-ड | निधन | १७/०३/२०२१ |

२. या महानगरपालिकांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

**आदेश**

३. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-**

राज्य निवडणूक आयोगाने दि. ०९/११/२०२१ च्या अधिसूचनेन्वये दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या पोटनिवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

४. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त महानगरपालिकांच्या उपरोक्त रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दि. १२/११/२०२१ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविणे | : दि.१२/११/२०२१ ते दि.१६/११/२०२१ पर्यंत |
| (iii) | प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : दि. १७/११/२०२१ |
| (iv) | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | : दि. २२/११/२०२१ |
| (v) | प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अधिप्रमाणित करून अंतिमरित्या प्रसिध्द करणे | : दि.२३/११/२०२१ |

५. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

५.१ सध्या विधानसभेच्या मतदार यादीचा डेटा राज्य निवडणूक आयोगास प्राप्त न झाल्यामुळे महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने मतदार यादीचे विभाजन होऊ शकत नाही. त्यामुळे महानगरपालिकांच्या सदर पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचे पारंपारीक पद्धतीने विभाजन करण्यात यावे.

**५.२ प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत महानगरपालिकांच्या संबंधित प्रभागाच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि पोटनिवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे याची खातरजमा करण्यात यावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का-५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटोकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

**६. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दि.१२/११/२०२१ रोजी महानगरपालिका आयुक्त यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ९प्रमाणे)

**७. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

७.१ दिनांक १२/११/२०२१ ते दिनांक १६/११/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

७.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा करुन प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात याव्यात.

८. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दि.२३/११/२०२१ रोजी मुद्दा क्र.९ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने प्रसिद्ध करण्यात यावी.

९. परिच्छेद ६ प्रमाणे प्रारुप व परिच्छेद ८ प्रमाणे अंतिम प्रभागनिहाय (मतदान केंद्रनिहायसह) मतदार यादीस महानगरपालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) महानगरपालिका मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ब) स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीची सूचना देऊन.

(क) स्थानिक केबल टि.व्ही.वर प्रसिध्दीची सूचना देऊन.

(ड) महानगरपालिकांचे संकेतस्थळ, इ.

१०. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व नोडल अधिकारी (उपायुक्त, निवडणूक) यांची राहील.

११ मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, नाशिक, औरंगाबाद, कोकण, पुणे.
५. जिल्हाधिकारी, धुळे, अहमदनगर, नांदेड, ठाणे, सांगली व रायगड.
६. सहायक आयुक्त(जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्या.५), राज्य निवडणूक आयोग.

निवडणूक प्राथम्य

**माहे डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकांसाठी दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. १/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०९/११/२०२१

## आदेश

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम१९(१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९)मधील कलम ७ (अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२१ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र